**<u>मेटार अपघात दावा क्रमांक २२/२०२२ मधील अर्ज</u>**
**<u>(निशाणी क्रमांक ३३) वरील आदेश</u>**
(सीएनआर क्र.एमएचएएच०७-०००१७७-२०२२)

०१. प्रस्तुत अर्ज सामनेवाला क्रमांक १ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ होवून मिळण्यासाठी व या प्रकरणात कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे. अर्जाचे पुष्ठयर्थ्य प्रतिज्ञापत्र (**<u>नि.क्र.३४</u>**) दाखल करण्यात आले आहे. सामनेवाला क्रमांक १ यांचे म्हणणे असे आहे की, सदर अपघाताबाबतचे कागदपत्रांच्या नक्कला उपलब्ध न होवु शकल्यामुळे मुदतीमध्ये कैफियत दाखल करू शकले नाही. तो जाणीवपुर्वक केलेला नाही. सबब, अर्ज मंजुर करुन कैफियत स्विकारण्याची विनंती त्यांनी केलेली आहे.

०२. अर्जदार यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करून अर्जास विरोध केलेला आहे. सामनेवाला नं.१ यांना दिनांक १४/०६/२०२३ रोजी नोटीस बजावणी झाली आहे. तेव्हापासुन २२ महिन्यांचा कालावधी लोटला आहे. दिनांक ०१/०७/२०२३ रोजी सामनेवाला नं.१ हजर झाला. अर्जात नमुद कारण खोटे आहे. यदाकदाचित अर्ज मंजुर करावा असे न्यायालयाचे मत झाल्यास जास्तीचा खर्चाचा हुकूम व्हावा अशी विनंती केली आहे.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणी सामनेवाला यांना दिनांक १४/०६/२०२३ च्या दरम्यान नोटीसची बजावणी झाल्याचे दिसते. सामनेवाला क्र.१ याने तेव्हापासुन ३० दिवसात कैफियत दाखल करणे आवश्यक होते. प्रस्तुत अर्ज दिनांक ०५/०२/२०२५ रोजी दाखल केलेला आहे. त्याकरीता बराच कालावधी घेतल्याचे दिसते. सामनेवाला क्र.१ यांच्यातर्फे नेक्स्ट फ्रेंड म्हणुन त्यांच्या पत्नीची नेमणुक झालेली आहे. सामनेवाला यांचे हितसंबंध प्रस्तुत अर्जात गुंतलेले आहेत. सामनेवाला यांना कैफियत दाखल करून अर्जास विरोध करण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्याने अर्जाचा गुणदोषावर निकाल होण्यास मदत होणार आहे. सदर सामनेवाला यांनी कैफियत दाखल करण्यास उशिर झाल्याबाबतचे दिलेले कारण हे योग्य व संयुक्तिक आहे असे वाटते. सामनेवाला क्र.१ यांना अर्जामध्ये कैफियत देण्याची संधी न दिल्यास त्यांचे फार नुकसान होणार आहे. सबब, झालेला उशीर खर्च देण्याच्या अटीवर माफ करणे योग्य ठरेल. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :-

**<u>आ दे श</u>**

०१. प्रस्तुत अर्ज (**<u>नि.क्र.३३</u>**) मुळ अर्जदार यांना रू.१,०००/- खर्च पुढील तारखेपर्यंत देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

०२. वर नमुद खर्च सामनेवाला क्रमांक १ यांनी दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

MANSOOR MAHAMOOD SHAIKH

Digitally signed by MANSOOR MAHAMOOD SHAIKH
Date: 2025.06.26 16:22:48 +0530

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- २६.०६.२०२५.

(एम. एम. शेख)
सदस्य, मोटार अपघात न्यायाधिकरण,
संगमनेर.